# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः22.10.2024** **वारःमंगळवार**

---

**ठळक बातम्या,**

ब्रिक्स शिखर परिषदेनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या रशिया दौऱ्यावर रवाना

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज नवी दिल्लीत पाचव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांचं वितरण करणार

महाराष्ट्र तसंच झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना आज जारी होणार

आणि

पूर्व लडाखमध्ये प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर गस्त घालण्याबाबत भारत आणि चीन यांच्यात करार

**पंतप्रधान रशिया**

कझान या शहरात आयोजित 16 व्या ब्रिक्स शिखर परिषदेला उपस्थित राहण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून दोन दिवसांच्या रशिया दौऱ्यावर जात आहेत. ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका या पाच देशांच्या ब्रिक्स समूहाची ही शिखर परिषद आजपासून सुरू होत आहे. केवळ जागतिक विकास आणि सुरक्षेसाठी बहुपक्षीयवादाचं बळकटीकरण अशी यावेळच्या या परिषदेची मध्यवर्ती संकल्पना आहे. कळीच्या जागतिक मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी नेत्यांकरिता हे महत्त्वाचं व्यासपीठ असल्याचं भारताचे रशियातील राजदूत विनय कुमार यांनी कझान इथं आकाशवाणीच्या वार्ताहराशी बोलताना सांगितलं. ब्रिक्स समुहानं सुरू केलेल्या उपक्रमांमधील प्रगतीचाही या परिषदेत आढावा घेतला जाणार आहे. उद्या या परिषदेचा मुख्य दिवस आहे. गेल्या वर्षी दक्षिण आफ्रिकेत जोहान्सबर्ग इथं या समुहाचा विस्तार करण्यात आला होता. त्यानंतर प्रथमच ही शिखर परिषद होत आहे. या दौऱ्यात पंतप्रधान मोदी रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांच्यासमवेत द्विपक्षीय बैठक घेणार आहेत. तसंच परिषदेच्या पार्श्र्वभूमीवर पंतप्रधान मोदी अन्य काही द्विपक्षीय बैठकांमध्येही सहभागी होण्याची अपेक्षा असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या अधिकाऱ्यानं सांगितलं.

**महाराष्ट्र निवडणूक**

महाराष्ट्रात एकाच टप्प्यात होत असलेल्या विधानसभा निवडणुकीसाठीची अधिसूचना आज प्रसिद्ध होणार असून राज्यातील सर्व 288 मतदारसंघांसाठी उमेदवारी अर्ज भरण्यासही आज सुरुवात होणार आहे. 29 ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. या अर्जांची छाननी

30 ऑक्टोबरला होईल आणि 4 नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येतील. 20 नोव्हेंबरला मतदान आणि 23 नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. राज्यातील नांदेड लोकसभा मतदारसंघाची पोटनिवडणूकही याच वेळापत्रकानुसार होणार आहे.

आठवले-फडणवीस
दरम्यान महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगानं जागावाटप, महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या बैठका, चर्चांचं सत्र जोरात सुरू आहे. याच अनुषंगानं रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष आणि केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी काल राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची जागावाटपासंदर्भात भेट घेतली. महाराष्ट्राशी संबंधित विविध राजकीय घडामोडींचा मुद्दा त्यांच्या चर्चेत केंद्रस्थानी होता.

**मनसे**
राज ठाकरेंच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं विधानसभेसाठी पक्षाची पहिली यादी जाहीर केली आहे. पक्षानं कल्याण ग्रामीण मधून राजू पाटील यांना तर ठाण्यातून अविनाश जाधव यांना उमेदवारी दिली आहे.

**झारखंड**
झारखंड विधानसभेसाठी 20 नोव्हेंबरला होणाऱ्या दुसऱ्या टप्प्यातील निवडणुकीची अधिसूचनाही आजच प्रसिद्ध होणार आहे. दुसऱ्या टप्प्यात 38 जागांसाठी मतदान होणार आहे. पहिल्या टप्प्यातलं मतदान 13 नोव्हेंबरला होणार असून, या टप्प्यासाठी अर्ज भरण्यास आता वेग आला आहे. आतापर्यंत 25 उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. पहिल्या टप्प्यासाठी अर्ज दाखल करण्याची मुदत 25 ऑक्टोबरपर्यंत आहे. या निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर राज्यात विविध ठिकाणी राबवण्यात येत असलेल्या कारवाईअंतर्गत सात कोटी 72 लाख रुपये किंमतीचं बेकायदेशीर साहित्य आणि रोख रक्कम हस्तगत करण्यात आली आहे. तर आचार संहिता भंगाच्या सहा तक्रारी दाखल झाल्या आहेत.दरम्यान राज्याच्या ग्रामीण भागात मतदानाची वेळ कमी करण्यात आल्याचा झारखंड मुक्ती मोर्चाचे नेते सुप्रियो भट्टाचार्य यांचा आरोप निवडणूक आयोगानं फेटाळला आहे.  नक्षलवाद्यांचा प्रभाव असलेल्या फक्त 981 केंद्रांवर मतदानाची वेळ सकाळी 7 ते दुपारी 4 वाजेपर्यंत ठेवण्यात आली आहे. इतर ठिकाणी मतदानाची वेळ संध्याकाळी 5 वाजेपर्यंत असणार आहे. अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी के. रवी कुमार यांनी दिली

**उपराष्ट्रपती**
अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आणखी पाच राष्ट्रीय बँकांना मुख्य सरव्यवस्थापक हे पद निर्माण करण्यास मंजुरी दिली आहे.  यामध्ये महाराष्ट्र बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, इंडियन ओव्हरसीज बँक, पंजाब आणि सिंध बँक तसंच युको बँकेचा समावेश आहे. ज्या बँकामध्ये सीजीएम

हे पद अगोदरच अस्तित्वात आहे, तिथे या  पदांची संख्या वाढवण्यासही सीतारामन यांनी मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळं 11 राष्ट्रीयकृत बँकांमधील सीजीएम पदांची एकूण संख्या आता 80 वरून 144 होणार आहे. ही पदसंख्येची फेररचना बँकांच्या चार सरव्यवस्थापकांमागे एक सीजीएम या गुणोत्तरावर आधारित असल्याचं अर्थ मंत्रालयानं म्हटलं आहे.

**उपराष्ट्रती**

संघर्ष आणि विसंवाद यामुळे विभागल्या गेलेल्या सध्याच्या या  जगात भारतीय कला, विशेषत: नृत्य सर्वसमावेशकतेचा आदर्श उदाहरण ठरतात असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीमध्ये आयोजित भारतीय नृत्य या विषयावरील आंतरराष्ट्रीय महोत्सवात उपस्थितांना संबोधित करताना ते काल बोलत होते. यावेळी बोलताना धनखड यांनी भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची ताकद अधोरेखित केली. सीमेपलीकडील लोकांना एकत्र आणण्यासाठी भारतीय कला प्रकाशाचा किरण दाखवतात. नृत्य कलाकार सांस्कृतिक आणि शांततेचे दूत असतात,ते संवादाला चालना देतात आणि सौहार्दपूर्ण राजनैतिक डावपेचांसाठी चांगलं वातावरण तयार  करतात असं धनखड म्हणाले.

**राष्ट्रीय जल पुरस्कार**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं राष्ट्रीय जल पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. पाचव्या राष्ट्रीय जल पुरस्कारांसाठी केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने नऊ श्रेणींमध्ये 38 विजेत्यांची घोषणा केली आहे. यामध्ये सर्वोत्कृष्ट राज्य, जिल्हा, ग्रामपंचायत, शहरी स्थानिक संस्था, पाणी वापरकर्ता संघटना आणि सर्वोत्कृष्ट नागरी संस्था यांचा समावेश आहे. सर्वोत्कृष्ट राज्याच्या श्रेणीमध्ये, प्रथम पारितोषिक ओडिशानं मिळवलं आहे, तर उत्तर प्रदेशनं दुसऱ्या क्रमांकाचं आणि तिसऱ्या क्रमांकाचं पारितोषिक गुजरात आणि पुद्दुचेरीनं संयुक्तपणे  मिळवलं आहे. जल व्यवस्थापन आणि जलसंधारणाबाबत राष्ट्रीय स्तरावर जनजागृती करण्यासाठी सरकारनं व्यापक मोहीम हाती घेतली असून, राष्ट्रीय जल पुरस्कार हे जल समृद्ध भारताचं ध्येय साध्य करण्यासाठी देशभरातील व्यक्ती आणि संस्थांनी केलेल्या चांगल्या कामासाठी दिले जातात.

**अमित शहा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज गुजरातमध्ये गांधीनगर इथं 14 व्या अखिल भारतीय नागरी संरक्षण  आणि गृह रक्षक दल परिषदेचं उद्घाटन करणार आहेत. अमित शहा सध्या गुजरात दौऱ्यावर असून या दौऱ्यात ते आणंद इथं राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाच्या 60 व्या वर्धापन दिन समारंभालाही उपस्थित राहणार आहेत. यावेळी त्यांच्या हस्ते या मंडळाच्या तीन नव्या प्रकल्पांचा प्रारंभ करण्यात यणार आहे.

**चीनगस्त**

लडाखमधल्या पूर्व भागातल्या प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर गस्त घालण्याबाबत भारत आणि चीन यांच्यात करार झाला आहे. या करारामुळे 2020 पासून निर्माण झालेला दोन्ही देशांमधला तणाव निवळण्याची शक्यता असल्याचं परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री  नवी दिल्लीत प्रसार माध्यमांशी बोलताना म्हणाले. दोन्ही देशांमध्ये याबाबत सविस्तर चर्चा झाल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला, असंही ते म्हणाले. तसंच, रशियन सैन्यात लढलेल्या भारतीयांच्या परत येण्याविषयीही मिस्री यांनी माहिती दिली. रशियातून 85 भारतीय मायदेशी परतले आहेत आणि जवळपास 20 जण अजूनही तिथेच असून या संदर्भात भारतीय दूतावासाचे अधिकारी रशियाच्या उच्चाधिकाऱ्यांशी संपर्क साधत आहेत, असं ते म्हणाले. दरम्यान भारत -चीन यांच्यात झालेल्या या कराराचं परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉक्टर एस. जयशंकर यांनी स्वागत केलं आहे.

**आयसीसी**

भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरची आयसीसी महिला मर्यादीत वीस षटकांच्या विश्वचषक स्पर्धेतील टीम ऑफ द टूर्नामेंटमध्ये निवड झाली आहे. आयसीसीनं जाहीर केलेल्या 12 सदस्यीय संघातील ती एकमेव भारतीय खेळाडू आहे, या संघात सात देशांच्या खेळाडूंचा समावेश आहे. नुकत्याच झालेल्या मर्यादीत वीस षटकांच्या विश्वचषक स्पर्धेत भारताची कामगिरी निराशाजनक ठरली असली, तरीही हरमनप्रीत कौरने आपल्या उत्कृष्ट कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तिने चार डावात 150 धावा केल्या. दुसरीकडे, दक्षिण आफ्रिकेच्या संघाला अंतिम फेरीत नेणारी कर्णधार लॉरा वोल्वार्ड हिला टीम ऑफ द टूर्नामेंट संघाची कर्णधार म्हणून नियुक्त करण्यात आलं आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**